दि. 01/11/2026

प्रेसनोट

पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेडमध्ये अवैध वाळू, तर लातुरात जुगाराविरुद्ध कारवाई

11 इसमांविरुद्ध कारवाई; 1 कोटी 5 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस पथक नांदेड व लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

नांदेड जिल्हयात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकास नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पिंपळगाव निमजी शिवारात पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 31.10.2026 रोजी मौजे पिंपळगाव निमजी शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, (1) हायवा, इंजिन बोट, फायबर बोट व (4) तराफे असा एकूण 86,70,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं 1409/2026 कलम 303 (2), 3(5) भारतीय न्याय संहिता, सह कलम कलम 48 (7), 48 (8) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 9,15 पर्यावरण (संरक्षण) अधिनियम व 3,7 सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

तद्नंतर, पथकाने लातूर जिल्ह्यातील औराद शहाजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावरी ते तगरखेडा जाणारे रोडवरील रमेश थेटे यांचे शेडमध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, 35,900/- रुपयांची रोकड, (11) मोबाईल, (2) चारचाकी वाहने व (5) मोटार सायकली असा एकूण 18,55,900/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (11) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द औराद शहाजनी पोलीस ठाणे येथे गुरनं 284/2026 कलम 12 (अ), 4,5 महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त दोन्हीही कारवायांत, पथकाने एकूण (11) इसमांकडून 35,900/- रुपयांची रोकड, (11) मोबाईल, (2) चारचाकी वाहने, (5) मोटार सायकली,एक हायवा, इंजिन बोट, फायबर बोट व (4) तराफे असा एकूण 1,05,25,900/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.